# विकसित महाराष्ट्र - २०४७

महाराष्ट्र शासनाचा २०२६-२०२७ या वर्षाचा

अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

## श्री. देवेंद्र फडणवीस

### मुख्यमंत्री

यांनी शुक्रवार, दिनांक ६ मार्च २०२६ रोजी

केलेले भाषण

भाग - पहिला

*

माननीय अध्यक्ष महोदय,

मी आज या सभागृहासमोर सन २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करण्यासाठी उभा आहे. हा अर्थसंकल्प केवळ आगामी वर्षाचा जमा-खर्च नसून तो 'विकसित महाराष्ट्र -२०४७' कडे जाणाऱ्या आपल्या प्रवासाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

आपल्या सर्वांचे आराध्य दैवत युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्यजननी जिजाऊ माँसाहेब, छत्रपती राजर्षि शाहू महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, या महामानवांना मी अभिवादन करतो.

आधुनिक भारतातील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत, थोर समाजसुधारक व मानवी मूल्यांचे पुरस्कर्ते महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जन्माला ११ एप्रिल, २०२७ रोजी २०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने सन २०२६-२७ या वर्षात महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी एक समिती स्थापन करून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतील व त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

संत गाडगेबाबा यांचे हे १५० वे जयंतीवर्ष आहे. त्यानिमित्ताने संत गाडगेबाबा यांचे जन्मस्थळ, कर्मभूमी व अंतिम श्रद्धास्थान या ठिकाणांना एकत्रित जोडून 'संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट' विकसित करण्यात येईल. ग्रामीण भागाच्या सर्वसमावेशक विकासासाठी प्रमुख राज्यस्तरीय अभियाने एकत्रित करून 'संत गाडगेबाबा ग्राम समृद्धी अभियान' राबविण्यात येईल. तसेच संत गाडगेबाबा उन्नत ग्राम योजनेअंतर्गत ७५ गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येईल.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड, जिल्हा रायगड येथील चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त तेथील पायाभूत सोयीसुविधांकरिता विकास आराखडा तयार करण्यात येईल.

महात्मा फुले, संत गाडगेबाबा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या स्मृतींचे हे विशेष वर्ष लक्षात घेता सन २०२६-२७ हे वर्ष ‘सामाजिक समता व समरसता वर्ष’ म्हणून साजरे करण्यात येईल. त्यांच्या कार्याचा गौरव करून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षपूर्ती निमित्त मी त्यांना अभिवादन करतो. त्यांच्या दादर, मुंबई येथील राष्ट्रीय स्मारकाचे पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्याचे काम जून, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

कालच जगद्‌गुरु संत तुकाराम महाराज बीज सोहळा संपन्न झाला. संत तुकाराम महाराजांना वंदन करून देहू येथील संत तुकाराम महाराजांच्या जन्मस्थानाच्या जतन व संवर्धनासाठी विकास आराखडा हाती घेण्याची मी घोषणा करतो.

आज हे भाषण करताना माझे मन अत्यंत जड झाले आहे. सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री पद आणि दीर्घकाळ वित्त विभागाची धुरा सांभाळलेले राज्याचे लाडके नेते माननीय अजितदादा पवार आज आपल्यात नाहीत. त्यांच्या जाण्याने राज्याच्या सार्वजनिक जीवनात आणि प्रशासनात कधीही भरून न निघणारी मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांनी एकूण ११ वेळा राज्याचा अर्थसंकल्प मांडला. अजितदादा व अर्थसंकल्प हे नाते दृढ झालेले होते. त्यांच्या करड्या शिस्तीमुळेच महाराष्ट्राची वित्तीय स्थिती कठीण काळातही स्थिर राहिली. ‘काम करणारा माणूस’ ही त्यांची ओळख आणि त्यांनी दिलेली विकासाची दिशा आजही आपल्याला प्रेरणा देत आहे. त्यांना श्रद्धांजली म्हणून सर्व मान्यवरांशी चर्चा करून त्यांच्या व्यक्तिमत्वाला साजेसे भव्य स्मारक उभारण्यात येईल तसेच त्यांच्या नावे ‘गतिमान नागरी सेवा पुरस्कार’ देण्यात येईल, असे मी जाहीर करतो. दिवंगत अजितदादांच्या स्मृतींना आजचा हा अर्थसंकल्प मी समर्पित करतो.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जनतेने महायुतीवर अभूतपूर्व विश्वास दाखवला, त्याबद्दल मी तमाम जनतेचे आभार मानतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रगतीसाठी महायुती सरकार कटीबद्ध राहील, याची मी ग्वाही देतो.

१६ व्या केंद्रीय वित्त आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार पुढील ५ वर्षामध्ये राज्यासाठी भरीव निधी प्राप्त होणार असून आपत्ती व्यवस्थापनासाठी केंद्र शासनाने वाढीव निधी देण्याबाबत राज्याची मागणी मान्य केली, त्याबाबत मी भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

राज्य शासनाने देखील सहाव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना केली होती. या वित्त आयोगाने विहित वेळेमध्ये आपला अहवाल सादर केला, याकरिता आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचे अभिनंदन करतो व त्यांना धन्यवाद देतो. हा अहवाल कृती अहवालासह माननीय राज्यपालांच्या मान्यतेनंतर पुढील अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची कार्यवाही करण्यात येईल. आयोगाच्या शिफारशींचा अभ्यास करुन प्रशासकीय सुधारणा व आर्थिक विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१ फेब्रुवारी, २०२६ रोजी केंद्र शासनाने युवाकेंद्रीत अर्थसंकल्प सादर केला. त्यात महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांचा वेगाने विकास करण्याकरिता भरीव अर्थसहाय्य केले आहे. मुंबई-पुणे व पुणे-हैद्राबाद या प्रस्तावित जलदगती रेल्वे प्रकल्पांमुळे सकल राज्य उत्पादनात मोठी वाढ होण्यास मदत होणार आहे. राज्यातील जनतेच्या वतीने मी भारताचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदीजी यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक इंजिन असल्याने ‘विकसित भारत-२०४७’ च्या स्वप्नपूर्तीत आपला वाटा सर्वात मोठा असेल. राज्याची अर्थव्यवस्था सन २०४७ पर्यंत ५ ट्रिलीयन डॉलर करणे, हे राज्याचे मुख्य ध्येय आहे. या ध्येयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने ‘विकसित महाराष्ट्र-२०४७ चे व्हिजन डॉक्युमेंट’ जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार सन २०२९-३० पर्यंत साध्य करावयाची अल्पकालीन उद्दिष्टे, राज्याचे अमृतमहोत्सवी वर्ष सन २०३५ पर्यंत साध्य करावयाची मध्यमकालीन उद्दिष्टे आणि भारतीय स्वातंत्र्याचे शताब्दी वर्ष सन २०४७ पर्यंत साध्य करावयाची दीर्घकालीन उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

राज्याच्या प्रादेशिक संतुलित विकासाला चालना देण्याकरिता चार प्रमुख स्तंभ ठरविण्यात आलेले आहेत.

(१) प्रगतिशील

(२) शाश्वत

(३) सर्वसमावेशक

(४) सुशासन

या चार स्तंभाच्या अंतर्गत १६ उपक्षेत्रे निश्चित करण्यात आलेली आहेत. सन २०४७ साली विकसित महाराष्ट्राची इमारत उभी करण्याकरिता इथून पुढे येणाऱ्या सर्व अर्थसंकल्पात विकसित महाराष्ट्राच्या संकल्पाचे प्रतिबिंब दिसणार आहे. या संकल्पाची दिशा कशी असेल, हे यावर्षीच्या अर्थसंकल्पात मी स्पष्ट करणार आहे.

**स्तंभ पहिला - प्रगतिशील महाराष्ट्र**

**उपक्षेत्र पहिले - कृषि, संलग्न क्षेत्र आणि ग्रामीण विकास**

राज्याचा कृषि जीडीपी सन २०४७ पर्यंत ५५ अब्ज डॉलर्सवरुन ५०० अब्ज डॉलर्सवर नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. राज्याचा पोशिंदा बळीराजाला केंद्रस्थानी ठेवून शेतीमालाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध होण्याकरिता १० ते १५ पिकांसाठी एकात्मिक मूल्यसाखळी तयार करण्यात येईल. शेतकऱ्यांना सुलभतेने सेवा देण्याकरिता ॲग्रीस्टॅक, महावेध, महाडीबीटी व इतर डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे शेतकऱ्यांसाठी एकात्मिक परिसंस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.

**महाराष्ट्र कृषि-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण**

१. महाराष्ट्र आज कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि डिजिटल शेतीमध्ये देशात आघाडीवर आहे. महाविस्तार-एआय या प्लॅटफॉर्ममुळे ३० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना हवामान अंदाज, पीक सल्ला आणि बाजारभावाची अचूक माहिती मिळत आहे. हा प्लॅटफॉर्म खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा ‘ डिजिटल सहकारी ’ आहे.

आदिवासी शेतकऱ्यांसाठी आम्ही ‘ महाविस्तार ’ मध्ये देहवाली भिली भाषेचा समावेश केला आहे. लवकरच इतर प्रमुख आदिवासी भाषाही जोडल्या जातील.

ज्यांच्याकडे स्मार्टफोन नाही, अशा शेतकऱ्यांसाठी आम्ही ‘ वसुधा ’ ही व्हॉइस सेवा सुरु केली आहे. याद्वारे फोन कॉलवरच पिकांचे आरोग्य आणि कीड व्यवस्थापनाबाबत सल्ला दिला जात आहे.

ॲग्रिकल्चर डेटा एक्सचेंज ॲंड सॅंडबॉक्स आणि राज्यातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स इनोव्हेशन ॲंड इनक्युबेशन सेंटर स्थापन करण्यात येत आहेत. यामुळे कृषि-स्टार्टअप्सना मोठी चालना मिळेल.

या आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेतीचा उत्पादन खर्च २५ टक्क्यांपर्यंत कमी होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मोठी मदत होणार आहे.

**ॲग्रीस्टॅक योजना**

२. कृषि क्षेत्रातील डेटा व डिजिटल सेवांच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत जलद व पारदर्शकपणे पोहोचविण्यासाठी राज्यात ॲग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यात महाराष्ट्र देशातील अग्रगण्य राज्य असून फेब्रुवारी, २०२६ पर्यंत १ कोटी ३१ लाख फार्मर आयडी तयार झाले आहेत. या योजनेत आम्ही आदिवासी वनपट्टेधारक शेतकरी यांचा देखील समावेश करीत आहोत.

**कृषि समृद्धी योजना**

३. कृषि समृद्धी योजनेअंतर्गत सन २०२६-२७ ते सन २०२९-३० या ४ वर्षाच्या कालावधीत राज्यातील कृषि क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येतील.

**नैसर्गिक शेती अभियान**

४. राज्यात ५ लक्ष हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणून सकस व पोषणयुक्त नैसर्गिक शेतीमाल उत्पादित करण्यासाठी आगामी दोन वर्षांमध्ये ‘ महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियान ’ या नवीन योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

**गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजना**

५. गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेत शेतमजुरांचा समावेश करण्यात येईल.

**मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना**

६. राज्याच्या कृषि उत्पन्नात पशुपालनाचा वाटा २५ टक्के आहे. ही व्याप्ती वाढवण्यासाठी आम्ही ‘ मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना ’ सुरु करत आहोत.

पशुसंवर्धन आणि मत्स्यव्यवसायाला आता कृषि समकक्ष दर्जा देण्यात आला आहे. यामुळे या क्षेत्रालाही शेतीप्रमाणेच सर्व पायाभूत सुविधा आणि सवलती मिळतील, ज्यामुळे मत्स्य आणि पशुजन्य उत्पादनात मोठी वाढ होईल.

संयुक्त राष्ट्र संघटनेने हे वर्ष ‘ आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष ’ म्हणून घोषित केले आहे. त्यानिमित्त महिला गो-पालक, कुक्कुटपालक आणि शेळीपालकांसाठी आम्ही विशेष प्रोत्साहनपर कार्यक्रम राबवणार आहोत.

**मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना**

७. मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या विकासासाठी प्रतिवर्षी १ हजार २४० कोटी रुपये आर्थिक भाराच्या ‘ मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेस ’ मान्यता देण्यात आली आहे. या योजनेमुळे राज्यातील मच्छिमारांचे आर्थिक व सामाजिक विकासाबरोबरच पायाभूत सुविधा निर्मितीमुळे मत्स्य उत्पादनात वाढ होणार आहे.

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजना**

८. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ अंतर्गत ९७ टक्के कामे (३० हजार किलोमीटर पेक्षा जास्त) पूर्ण झाली असून उर्वरित कामे मार्च, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. टप्पा-२ अंतर्गत २ हजार ४५० किलोमीटर रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

आता आम्ही टप्पा-३ घोषित करत असून त्याअंतर्गत २३ हजार किलोमीटर लांबीच्या रस्ते व पुलांची कामे हाती घेण्यात येतील.

**मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजना**

९. ग्रामीण भागातील शेतपाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी पूर्णपणे यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने जलदगतीने काम करण्याकरिता सोपी व सुलभ कार्यपद्धती असलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते या नवीन योजनेस मान्यता देण्यात आली आहे.

**प्रधानमंत्री ग्रामसडक योजना**

१०. प्रधानमंत्री ग्राम सडक या योजनेचे भाग-१ व २ अंतर्गत ९९ टक्के कामे (२६ हजार ७५८ किलोमीटर रस्ते व ७८२ पूल) पूर्ण झाली आहेत.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग-३ अंतर्गत ६ हजार ३३१ किलोमीटर लांबीचे ९९३ रस्त्यांच्या कामांपैकी ५ हजार ८६ किलोमीटर लांबीची ६७३ कामे तसेच २२३ पुलांच्या कामांपैकी ५७ पुलांची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग-४ अंतर्गत लोकवस्तीशी न जोडलेल्या वाड्या-वस्त्या बारमाही रस्त्याने जोडण्याची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

११. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत सन २०२४-२५ व २०२५-२६ करिता २७ लाख ८७ हजार मंजूर घरकुलांपैकी ३ लाख ५७ हजार घरकुले पूर्ण झाली असून उर्वरित घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत.

या योजनेअंतर्गत आत्तापर्यंत ३३ हजार ४१० कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे.

पंतप्रधान आवास योजना- शहरी व ग्रामीण अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांवर रुफटॉप सोलार लावण्यासाठी अतिरिक्त अनुदान उपलब्ध करून ऊर्जा स्वावलंबन साध्य करण्यात येणार आहे.

पीएम-जनमन आवास योजनेअंतर्गत ५४ हजार १२९ घरकुलांना मंजुरी देण्यात आली असून १७ हजार ९२९ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

## उपक्षेत्र दुसरे - उद्योग

राज्यातील उद्योग क्षेत्राचे स्थूल उत्पन्न सन २०४७ पर्यंत १२३ अब्ज डॉलर्सवरुन १५०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. त्याकरिता उच्च क्षमता असलेल्या क्षेत्रांकरिता मूल्यसाखळी निर्माण करणे व प्रत्येक उदयोन्मुख जिल्ह्यात मोठे औद्योगिक समूह उभारण्यात येणार आहेत. तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगासाठी अर्थसहाय्य देऊन महाराष्ट्र हे जागतिक उत्पादनाचे केंद्र बनविण्यात येणार आहे.

**उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५**

१२. राज्याचे नवीन उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५ जाहीर करण्यात आले आहे. २०४७ पर्यंत उद्योग क्षेत्राचा स्थूल राज्य उत्पन्नातील वाटा ३० टक्क्यांपर्यंत नेण्याचे आमचे ध्येय आहे. यासाठी इन्व्हेस्ट महाराष्ट्र हा एकसंध डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित केला जात आहे.

थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात अव्वल आहे. राज्यात प्रत्येक जिल्ह्यात ‘सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग केंद्रे’ स्थापन केली जातील. या धोरणातून सुमारे ५० लाख प्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील. याकरिता सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी आयुक्तालय व सेवा क्षेत्रासाठी आयुक्तालय स्थापन करण्याची मी घोषणा करीत आहे.

**निर्यात प्रोत्साहन धोरण-२०२५**

१३. केंद्र शासनाकडून नवी दिल्ली येथे आयोजित ‘राष्ट्रीय एक जिल्हा एक उत्पादन पुरस्कार- २०२५’ सोहळ्यामध्ये महाराष्ट्र राज्याला सुवर्ण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच राज्यातील रत्नागिरी, नागपूर, अमरावती, अकोला व नाशिक या जिल्ह्यांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

निति आयोगाकडून जाहीर करण्यात आलेल्या ‘निर्यात सिद्धता निर्देशांक-२०२४’ मध्ये महाराष्ट्र राज्याला देशामध्ये प्रथम स्थान प्राप्त झाले आहे.

**बांबू विकास प्रकल्प**

१४. महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण - २०२५ जाहीर करण्यात आले आहे. या अंतर्गत ५० हजार कोटींपेक्षा जास्त रकमेची गुंतवणूक आकर्षित करण्यात येणार असून ५ लक्ष प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.

आशियाई विकास बॅंक अर्थसहाय्यित सुमारे ४ हजार २७१ कोटी रुपयांच्या बांबू विकास प्रकल्पांतर्गत औष्णिक विद्युत प्रकल्पात बांबू बायोमासचा वापर वाढविणे तसेच जीआयएस, ब्लॉकचेन, टिश्यू कल्चर इत्यादींच्या माध्यमातून बांबू मूल्य साखळीचा विकास करण्याचे नियोजन आहे.

**स्टील हब**

१५. स्टील हब म्हणून उदयास येत असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात लोहखनिजावर आधारित विशाल व अतिविशाल स्टील उद्योगांच्या माध्यमातून सुमारे २ लक्ष ६२ हजार कोटी रुपये गुंतवणूक व ७० हजार पेक्षा जास्त रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील खनिज संपत्तीची वाहतूक सुरळीत होण्याकरिता आणि जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याच्या दृष्टीने रस्ते विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यातील जैवविविधता संवर्धनासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून ५ कोटी वृक्षलागवड करण्यात येत आहे.

रत्ने व आभूषणे धोरण

१६. राज्याचे नवीन महाराष्ट्र रत्ने व आभूषणे धोरण-२०२५ जाहीर करण्यात आले आहे. या अंतर्गत १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व ५ लाख रोजगार निर्मिती करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

**उपक्षेत्र तिसरे - सेवा क्षेत्र**

राज्यात सेवा क्षेत्राचे स्थूल उत्पन्न सन २०४७ पर्यंत ३१२ अब्ज डॉलर्सवरून ३ हजार अब्ज डॉलर्सवर नेण्याचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मुंबई आणि पुण्याला ५० अब्ज डॉलर्सचे 'मिडीया टेक आणि एव्हीजीसी' केंद्र बनविणे, ३० लाखाहून अधिक रोजगारनिर्मिती करण्यासाठी जागतिक क्षमता केंद्र स्थापन करणे तसेच नवउपक्रम शहरांची उभारणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

महाराष्ट्र एव्हीजीसी धोरण-२०२५

१७. महाराष्ट्र राज्याला ॲनिमेशन, गेमिंग आणि व्हिज्युअल इफेक्ट्स (AVGC) क्षेत्रात जगात अव्वल बनवण्यासाठी आम्ही AVGC-XR धोरण-२०२५ जाहीर केले आहे. याद्वारे राज्यात २९५ पेक्षा जास्त स्टुडिओ, विशेष पार्क्स आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन दिले जाईल.

मागील वर्षी केंद्र व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत जागतिक दृकश्राव्य व मनोरंजन परिषद - WAVES यशस्वीपणे संपन्न झाली. या क्षेत्रातील उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी मुंबईत केंद्र सरकारच्या मदतीने 'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी' सुरु करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र-जीसीसी धोरण-२०२५

१८. विकसित महाराष्ट्र - २०४७ या दृष्टिकोनाशी सुसंगत 'महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र-जीसीसी धोरण - २०२५' तयार करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील पुणे हे जीसीसीसाठी देशातील सर्वाधिक पसंतीचे स्थान ठरत आहे. राज्यात या धोरणाच्या माध्यमातून ४०० नवीन जागतिक क्षमता केंद्र स्थापन करण्यात येणार असून ४ लक्ष उच्च-कुशल नोकरीच्या संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.

## उपक्षेत्र चौथे - पर्यटन

राज्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या सन २०४७ पर्यंत वार्षिक १६ कोटींवरून ३८ कोटींपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. त्याकरिता मुंबई, सिंगापूर आणि दुबईमध्ये पर्यटन गुंतवणूक कक्ष सुरु करणे, खाजगी गुंतवणूक आकर्षित करून जागतिक दर्जाची पर्यटन स्थळे व पर्यटन परिपथ विकसित करणे, तसेच प्रवास १०० टक्के डिजिटाईज करून पर्यटन परिसंस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त निवडक ५० पर्यटनस्थळी पायाभूत सुविधा अत्याधुनिक करण्यासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून प्राधान्याने निधी उपलब्ध करण्यात येईल.

**वासोटा किल्ला रोपवे**

१९. सातारा जिल्ह्यातील सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेला वासोटा किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे आणि रणनीतीचे प्रतीक आहे. पर्यटकांच्या सुरक्षित, सुलभ व पर्यावरणपूरक प्रवेशाकरिता मुनावळे ते वासोटा किल्ला रोपवे प्रकल्प करण्याचे नियोजित आहे.

**रामकाल पथ विकास**

२०. नाशिक येथे रामकाल पथ विकास प्रकल्पातंर्गत करण्यात येणारी कामे प्रगती पथावर आहेत.

**रामटेक चित्रनगरी व रामसृष्टी**

२१. राज्यातील तिसरी चित्रनगरी नवरगाव, तालुका रामटेक, जिल्हा नागपूर येथे विकसित करण्यात येणार आहे.

रामटेक येथे रामसृष्टी व कालीदास सृष्टी उभारण्यात येईल. तसेच महाकवी कालिदास यांचे जीवनचरित्र सर्वसामान्य जनतेला व नवीन पिढीला कळावे, याकरिता चित्रपट निर्मितीसाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल.

**तीर्थक्षेत्र विकास**

२२. देशातील एकूण बारा ज्योतिर्लिंगापैकी राज्यात असलेल्या पाच ज्योतिर्लिंगांच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी व तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवेतील पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे नियमित आढावा, समन्वय व नियंत्रण करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

पंढरपूर मंदिर विकास आराखड्याच्या पहिल्या टप्प्यातील कामे पूर्णत्वाच्या मार्गावर असून पुढील विकासकामांचे नियोजन प्रगतीत आहे.

महानुभाव पंथीयांच्या विविध धार्मिक स्थळांच्या ठिकाणी पायाभूत सुविधांचा विकास करण्याची कामे प्रगतीपथावर असून त्याकरिता आवश्यक निधी उपलब्ध करण्यात येईल.

**स्तंभ दुसरा - शाश्वत**

**उपक्षेत्र पहिले - शाश्वत शहरी विकास**

२०४७ पर्यंत राज्याची नागरी लोकसंख्या ७० टक्के होणार असून स्थूल राज्य उत्पन्नात या घटकाचे ७५ ते ८० टक्के योगदान असणार आहे. राज्यात शाश्वत शहरी विकास करण्याकरिता १० पेक्षा जास्त सक्षम प्रादेशिक विकास प्राधिकरणे स्थापन करणे, ५० पेक्षा अधिक सुनियोजित, बहुपयोगी शहरी समूह विकसित करणे, वाहतूक केंद्रित विकास तसेच शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सेवा १०० टक्के डिजिटाईज करण्याचे नियोजित आहे.

**मुंबई महानगर प्रदेश व इतर विकास केंद्र**

२३. मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था २०३० पर्यंत १४० अब्ज डॉलरवरून ३०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

२४. वडाळा येथे जागतिक दर्जाचे स्टार्ट-अप आणि इनोव्हेशन हब स्थापन करण्यासाठी १३० एकर जमीन वाटप करण्यात आली आहे.

२५. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गातील ठाणे ते तलासरी मधील तीन स्थानकांचे काम फेब्रुवारी, २०२७ अखेर पूर्ण होणार आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पाद्वारे निर्माण होणाऱ्या आर्थिक मूल्याचा फायदा घेण्यासाठी विरार, बोईसर आणि ठाणे बुलेट ट्रेन स्थानकाभोवतीच्या क्षेत्राच्या विकासाकरिता बृहद् आराखडा तयार करण्यात येईल.

२६. अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू परिसरात तिसरी मुंबई (मुंबई ३.०) विकसित करण्यात येईल. या अंतर्गत कर्नाळा-साई-चिरनेर, रायगड-पेण आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित क्षेत्र ही ग्रीन-फिल्ड विकास केंद्र म्हणून विकसित करण्याचे नियोजन आहे.

२७. वाढवण, जिल्हा पालघर जवळ चौथी मुंबई विकसित करण्याचे नियोजित असून त्याअंतर्गत लॉजिस्टिक्स आणि वेअर हाऊसिंगसाठी विकास केंद्रे निर्माण करण्यात येतील.

२८. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर प्रदेशातील २० लाख झोपडपट्टीधारकांच्या घरांच्या पुनर्विकासासाठी तसेच भाडेतत्त्वावरील घरांसह १० लाख परवडणारी घरे विकसित करण्यासाठी बृहद् आराखडा तयार करण्यात येत आहे.

२९. मुंबई महानगर प्रदेशात नवीन बेकायदेशीर बांधकामे होणार नाहीत याची खात्री करण्यासाठी जीआयएस आधारित मॅपिंगचा वापर करुन ‘नो न्यू स्लम फ्रेमवर्क’ विकसित करण्यात येत आहे. सदर फ्रेमवर्क पुढे इतर शहरात देखील लागू करण्यात येईल.

३०. केंद्र शासनाकडून निति आयोगामार्फत देशभरातील निवडक क्षेत्रांच्या आर्थिक वाढीचा रोड मॅप तयार करण्यात येत आहे. मुंबई महानगरच्या धर्तीवर ‘पुणे, नाशिक, नागपूर व छत्रपती संभाजीनगर ग्रोथ हब’ प्रकल्पाचा विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे.

३१. नागपूर शहराच्या आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी ‘नवीन नागपूर’ म्हणून व्यापार व वित्तीय केंद्र विकसित करण्यात येत आहे.

नागपूर शहराच्या विकास व विस्ताराला चालना देण्यासाठी नागपूर रिंगरोडला मान्यता देण्यात आली आहे.

**उपक्षेत्र दुसरे - वाहतूक व मालपुरवठा व्यवस्थापन**

राज्यात सन २०४७ पर्यंत प्रवासी व माल वाहतुकीकरिता सलग संपर्क जाळे निर्माण करण्यासाठी १ हजार २०० किलोमीटर लांबीचे मेट्रोमार्ग तसेच ६ हजार किलोमीटरपेक्षा जास्त द्रुतगती मार्ग विकसित करण्याचे नियोजन आहे.

**मेट्रो मार्ग**

३२. मुंबई, पुणे व नागपूर शहरांमध्ये एकूण ४९० किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिका उभारण्याचे काम हाती घेण्यात आले असून त्यापैकी १७३ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या करण्यात आल्या आहेत. तसेच आगामी वर्षात ५० किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या करण्याचे नियोजन आहे. सन २०२९ पर्यंत आणखी १६५ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिका सुरु करण्यात येणार आहेत.

३३. वडाळा ते गेट वे ऑफ इंडिया, मुंबई मेट्रो मार्गिका-११ हा २३ हजार ४८७ कोटी रुपये किमतीचा पूर्णतः भूमिगत प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाचा विस्तार धारावी पुनर्वसन प्रकल्पातून पुढे वांद्रे उपनगरीय स्थानक व वांद्रे टर्मिनस पर्यंत करण्याचे नियोजन आहे.

३४. मुंबई विमानतळ आणि नवी मुंबई विमानतळ यांना जोडणारा मुंबई मेट्रो मार्ग-८ हा २२ हजार ८६२ कोटी रुपये किमतीचा प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे.

३५. तळोजा ते खांदेश्वर नवी मुंबई मेट्रो मार्ग-२ या ५ हजार ५७५ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पामुळे नवी मुंबई विमानतळापर्यंत वाहतूक व्यवस्थेत लक्षणीय सुधारणा होईल.

**भुयारी मार्ग**

३६. रस्त्यांवरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी मुंबई आणि पुणे शहरात भुयारी मार्गाचे जाळे उभारण्याचा शासनाचा मानस आहे.

मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्तमार्ग ते मरिन ड्राईव्ह दरम्यान भुयारी मार्ग प्रकल्पाच्या लॉचिंग शाफ्टचे बांधकाम पूर्ण झाले आहे. हा प्रकल्प डिसेंबर, २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

३७. मुंबईतील पूर्व आणि पश्चिम परिसराला जोडणाऱ्या गोरेगांव-मुलुंड या भुयारी मार्गाच्या पहिल्या टप्प्याचे काम अंतिम स्तरावर आहे.

३८. ठाणे ते बोरीवली या १८ हजार ८३८ कोटी रुपये किंमतीच्या भुयारी मार्गाचे काम प्रगतीपथावर असून जून, २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

३९. खारघर ते तुर्भे या सुमारे ६ किलोमीटर लांबीच्या २ हजार १०० कोटी रुपये किमतीच्या भुयारी मार्गाचे काम सप्टेंबर, २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

४०. एकात्मिक भुयारी मार्ग रस्ता प्रकल्प अंतर्गत वांद्रे-वरळी सागरी सेतू ते बुलेट ट्रेन स्थानक, वांद्रे-कुर्ला संकुल ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ जोडण्यात येणार आहे. गायमुख जंक्शन ते फाउंटन हॉटेल जंक्शन दरम्यान सुमारे ६ किलोमीटर लांबीचा भुयारी मार्ग व फाउंटन हॉटेल ते भायंदर दरम्यान सुमारे ९ किलोमीटर लांबीचा उन्नत मार्ग प्रस्तावित आहे.

**उन्नत मार्ग**

४१. पूर्वेकडील अटल सेतू ते पश्चिमेकडील सागरी किनारा मार्ग आणि वांद्रे-वरळी सागरी सेतू यांच्या दरम्यान सिग्नल विरहीत वाहतूकीकरिता शिवडी-वरळी या उन्नत मार्गाचे काम प्रगतिपथावर असून सप्टेंबर, २०२६ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

४२. ऐरोली ते कटाई नाका या उन्नत मार्गाचे भाग-३ चे काम हाती घेण्यात आले आहे.

४३. ठाणे ते नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ असा उन्नत मार्ग बांधण्याच्या प्रकल्पास मान्यता दिली आहे.

४४.  अटल सेतू ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गापर्यंत १ हजार १०२ कोटी रुपये किंमतीचा उन्नत मार्ग फेब्रुवारी, २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

४५.  दक्षिण मुंबईला समृद्धी महामार्गाशी थेट जोडण्याकरिता छेडा नगर ते आनंद नगर व आनंद नगर ते साकेत, ठाणे या उन्नत मार्गाचे काम डिसेंबर, २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच साकेत ते आमणे या उन्नत मार्गाच्या कामाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे.

**सागरी सेतू**

४६.  स्वातंत्र्यवीर सावरकर वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू या १८ हजार १२१ कोटी रुपये किंमतीच्या प्रकल्पाचे चारही टप्प्याचे काम प्रगतीत असून प्रकल्प मे, २०२८ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

वर्सोवा - दहिसर - भायंदर हा २२ हजार १६६ कोटी रुपये किमतीचा सुमारे ६० किलोमीटर लांबीचा किनारी मार्ग प्रगतीत असून डिसेंबर, २०२८ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

४७.  मुंबई-वाढवण द्रुतगती जोडणी करण्याकरिता उत्तन ते विरार या सुमारे ५८ हजार ७५४ कोटी रुपये किमतीच्या सागरी सेतूचे काम हाती घेण्यात आले आहे.

**किनारी मार्ग**

४८.  बाळकुम ते गायमुख या ठाणे किनारी रस्ता प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून हा प्रकल्प डिसेंबर, २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

४९.  अटल सेतूला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडण्याकरिता उलवे किनारी मार्गाचे काम जुलै, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वे**

५०.  पनवेल ते कर्जत या २ हजार ७८२ कोटी रुपये किंमतीच्या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून तो लवकरच वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन आहे.

**मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - (३ब)** ५१. मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - (३ब) या १४ हजार ९०७ कोटी रुपये किमतीच्या कामास मान्यता देण्यात आली असून, त्यात राज्य शासनाचा ५० टक्के आर्थिक सहभाग आहे.

या प्रकल्पांतर्गत बदलापूर-कर्जत, आसनगांव ते कसारा, पनवेल ते वसई या दरम्यान सुमारे ६९ किलोमीटर लांबीचे नवीन उपनगरीय रेल्वे कॉरिडॉर प्रस्तावित आहेत.

**पुणे-लोणावळा उपनगरीय रेल्वे** ५२. पुणे-लोणावळा तिसऱ्या व चौथ्या रेल्वेमार्गिकेच्या ५ हजार १०० कोटी रुपये किंमतीच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पाचा पिंपरी-चिंचवड, आकुर्डी आणि तळेगाव या औद्योगिक पट्ट्यांना थेट लाभ होईल.

**पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२** ५३. पुणे महानगर मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-२ मधील खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी मेट्रो मार्गिकेच्या उपमार्गिका हडपसर ते लोणी-काळभोर आणि हडपसर बस डेपो ते सासवड रोड या प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे.

पुण्यातील रामवाडी ते वाघोली दरम्यान ११ किलोमीटर लांबीच्या मेट्रो प्रकल्पास देखील मान्यता देण्यात आली आहे.

येरवडा ते कात्रज तसेच हिंजेवाडी ते सिंहगड रोड या ५४ किलोमीटर दुहेरी भुयारी मार्गाचा व्यवहार्यता अहवाल तयार करण्यात येत आहे.

**रेल्वे मार्ग** ५४. राज्यातील विविध रेल्वे प्रकल्पाकरिता ५० टक्के राज्य हिश्श्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**महाराष्ट्र अमृतकाल रस्ते विकास योजना** ५५. ‘महाराष्ट्र अमृतकाल रस्ते विकास योजना २०२५ ते २०४७’ अंतर्गत राज्यातील रस्त्यांचा टप्प्याटप्प्याने विकास केला जाईल. या योजनेत ६ हजार २७२ किलोमीटरचे द्रुतगती मार्ग आणि १४ हजार ९१९ किलोमीटरचे राज्य व जिल्हा मार्ग तसेच ४ हजार २४७ किलोमीटरचे ‘पर्यटन परिपथ’ समाविष्ट आहेत. ही योजना महाराष्ट्राला ५ ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेकडे नेण्यासाठी महत्त्वाची असणार आहे.

**शक्तिपीठ महामार्ग**

५६. पवनार, जिल्हा वर्धा ते पत्रादेवी, जिल्हा सिंधुदुर्ग या शक्तिपीठ महामार्गाच्या कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुधारित संरेखनास मान्यता देण्यात आली असून भूसंपादनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

**कल्याण ते लातूर द्रुतगती महामार्ग**

५७. कल्याण, जिल्हा ठाणे ते लातूर पर्यंत ग्रीनफिल्ड द्रुतगती महामार्ग उभारण्याचे प्रस्तावित असून त्याच्या संरेखनाची कार्यवाही सुरु आहे.

**ग्रामीण रस्ते**

५८. राज्यातील १ हजार पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रिट रस्त्यांनी जोडण्यात येईल, असे मी घोषित करीत आहे. त्याकरिता आशियाई बँकेच्या सहाय्याने ४ हजार ५०० कोटी रुपये किंमतीचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

**हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गास जोडणारे प्रकल्प**

५९. राज्यातील पूर्व विभागातील नैसर्गिक खनिज संपत्तीने समृध्द असलेल्या भागाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिने नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली, नागपूर-चंद्रपूर या प्रवेश नियंत्रित शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गाच्या कामास मान्यता देण्यात आलेली आहे.

वाढवण बंदरालादेखील समृद्धी महामार्गाने जोडण्याकरिता तवा ते भरवीर माल वाहतूक कॉरिडॉरच्या कामास मान्यता देण्यात आली आहे.

**पुणे ते शिरुर उन्नत मार्ग**

६०. पुणे ते शिरूर हे ५३ किलोमीटर लांबीचे ७ हजार ५१४ कोटी रुपये किमतीचे उन्नत मार्गाचे काम मंजूर करण्यात आले आहे.

**तळेगाव-चाकण उन्नतमार्ग व चाकण-शिक्रापूर सहापदरी मार्ग**

६१. तळेगाव-चाकण हा ६ हजार ४९९ कोटी रुपये किमतीचा २५ किलोमीटर लांबीचा उन्नतमार्ग व चाकण- शिक्रापूर या ५ हजार २३२ कोटी रुपये किमतीच्या २८ किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या सहापदरीकरणाची कामे हाती घेण्यात आली आहेत.

**शिरुर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीनफील्ड महामार्ग**

६२. पुणे ते छत्रपती संभाजीनगर जलद व सुलभ प्रवासासाठी शिरुर ते छत्रपती संभाजीनगर या १९२ किलोमीटर लांबीच्या १४ हजार ८८६ कोटी रुपये किमतीच्या ग्रीनफील्ड महामार्गाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे.

**छत्रपती संभाजीनगर विमानतळ ते वाळूज उन्नत मार्ग**

६३. छत्रपती संभाजीनगर विमानतळ ते वाळूज एमआयडीसी दरम्यान उन्नत मार्गाचे काम दोन टप्प्यामध्ये करण्यात येईल.

**हडपसर-यवत सहापदरी मार्ग**

६४. हडपसर-यवत या ५ हजार २६२ कोटी रुपये किमतीच्या ३१.५० किलोमीटर लांबीच्या सहापदरी रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**विमानतळ विकास**

६५. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन देशांतर्गत विमानसेवा २५ डिसेंबर, २०२५ पासून सुरु झाली आहे.

छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ, पुरंदर, पुणे करिता विशेष हेतू प्राधिकरणाची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली असून भूसंपादनाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

गडचिरोली ग्रीनफिल्ड विमानतळासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

लातूर, बारामती व अमरावती येथील विमानतळाच्या ठिकाणी रात्रीच्या उड्डाणांकरिता सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

शिर्डी, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, अकोला, रत्नागिरी, यवतमाळ आणि कराड विमानतळांच्या विस्तारीकरणाची कामे सुरु करण्यात येत आहेत.

**प्रवासी जलवाहतूक**

६६. मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या वाहतूक कोंडीला पर्यायी, पर्यावरणपूरक व स्वस्त उपाय म्हणून सध्याचे जलमार्गाचे १२५ किलोमीटरचे जाळे ३४० किलोमीटरपर्यंत विस्तारण्यात येणार आहे. त्यामुळे सध्या वार्षिक १ कोटी ६० लाख असलेली प्रवासी संख्या सन २०३१ पर्यंत ७ कोटी ३९ लाखापर्यंत वाढेल.

यासाठी २१ विद्यमान जलमार्गावरील २० टर्मिनल्सचे अद्ययावतीकरण तसेच ११ नवीन जलमार्गावर २४ टर्मिनल्सच्या निर्मितीसाठी ६ हजार ६०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

मुंबई मधील रेडीओ क्लब येथील नवीन जेट्टी प्रकल्प डिसेंबर, २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**वाढवण बंदर**

६७. देशातील सर्वात मोठे बंदर म्हणून उदयास येत असलेल्या पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर प्रकल्पाकरिता राज्य हिस्सा म्हणून आवश्यक निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

मच्छीमारांच्या अडचणी व गरजा लक्षात घेता पालघर जिल्ह्यातील सातपाटी येथे आधुनिक मत्स्य बंदर विकसित करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे बोटींसाठी सुरक्षित थांबा, वादळी वाऱ्यापासून संरक्षण आणि आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध होणार असून त्याद्वारे मत्स्य उत्पादनात वाढ होणार आहे.

वाढवण बंदर प्रकल्पातून १२ लाखांहून अधिक थेट रोजगार निर्मिती होणार आहे. वाढवणच्या आसपासच्या सुमारे ४४ गावांमधील स्थानिक तरुणांना रोजगार देण्यासाठी वाढवण बंदर कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

**महाराष्ट्र जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती व जहाज पुनर्वापर धोरण-२०२५**

६८. राज्य शासनाने ‘महाराष्ट्र जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती व जहाज पुनर्वापर धोरण-२०२५’ जाहीर केले आहे. या धोरणाअंतर्गत मरीन शिपयार्ड क्लस्टर विकसित करण्यात येणार आहेत. ग्रीनफिल्ड जहाज बांधणी क्लस्टर प्रकल्पासाठी आवश्यक तरतूद करण्यात येईल.

## उपक्षेत्र तिसरे - ऊर्जा आणि शाश्वतता

सन २०४७ पर्यंत ७५ टक्के स्वच्छ ऊर्जा मिळवण्याचे राज्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी राज्यात सौर, पवन आणि हरित हायड्रोजन प्रकल्पांना चालना दिली जात आहे.

**मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना**

६९. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत साडेसात हॉर्स पॉवर पर्यंतच्या कृषि पंप ग्राहकांना वीज बिलामध्ये १०० टक्के सवलतीच्या अनुषंगाने योजनेच्या अंमलबजावणी पासून फेब्रुवारी, २०२६ पर्यंत ३२ हजार ७५६ कोटी रुपये वितरित केले आहेत. सन २०२६-२७ मध्ये २० हजार कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

**मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना २.०** ७०. मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना-२.० अंतर्गत एकूण १६ हजार मेगावॅट सौर ऊर्जा क्षमता स्थापित करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील शंभर टक्के कृषि पंप ग्राहकांना दिवसा वीजपुरवठा करण्याचा उद्देश साध्य होणार आहे. या योजनेअंतर्गत आत्तापर्यंत ३ हजार ३४९ मेगावॅट क्षमता कार्यान्वित झाली असून, डिसेंबर २०२६ पर्यंत सुमारे १० हजार मेगावॅट अतिरिक्त क्षमता निर्माण होणार आहे.

**मागेल त्याला सौर कृषि पंप** ७१. प्रधानमंत्री कुसुम घटक 'ब' योजनेअंतर्गत तसेच मागेल त्याला सौर कृषि पंप योजनेअंतर्गत एकूण ६ लक्ष ६३ हजार ३२४ सौर कृषि पंप आस्थापित करण्यात आले आहेत. कुसुम घटक 'ब' योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र राज्य हे देशात प्रथम क्रमांकावर आहे.

मला सांगण्यास आनंद वाटतो की, मागेल त्याला सौर कृषि पंप योजनेअंतर्गत डिसेंबर, २०२५ या एका महिन्यात ४५ हजार ९११ इतके सौर कृषि पंप बसवून महाराष्ट्र राज्याची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली आहे.

**प्रधानमंत्री सूर्यघर योजना** ७२. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत देशात राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे. आत्तापर्यंत ४ लक्ष ५७ हजार घरगुती ग्राहकांनी १ हजार ७३५ मेगावॅटपेक्षा जास्त क्षमतेचे रुफटॉप सोलार स्थापित केले आहेत. या ग्राहकांना ३ हजार २०० कोटी रुपये सबसिडीचा लाभ देण्यात आलेला आहे.

शून्य ते शंभर युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासिय रुफटॉप सोलार योजना - स्मार्ट योजना मंजूर केली आहे. या योजनेत ५ लाख लाभार्थ्यांसाठी ६३५ कोटी रुपयांचे अनुदान राज्य शासन देणार आहे.

**अपारंपारिक ऊर्जा धोरण** ७३. राज्याची पुढील १० वर्षाची स्वच्छ व पर्यावरणपूरक ऊर्जेची गरज विचारात घेता 'महाराष्ट्र नवीकरणीय ऊर्जा आणि ऊर्जा साठवणूक धोरण २०२५ ते २०३५' जाहीर करण्यात आले आहे.

त्याअंतर्गत सन २०२९ पर्यंत ५० टक्के व सन २०३५ पर्यंत ६५ टक्के हरित ऊर्जा प्राप्त करण्याचे उद्दिष्ट आहे. या धोरणामुळे राज्यात तीन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून राज्य वस्तू व सेवाकराच्या माध्यमातून १५ हजार ६०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळू शकणार आहे.

**उदंचन जलविद्युत**

७४. उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसनाच्या धोरणाअंतर्गत आत्तापर्यंत एकूण ५५ उदंचन प्रकल्पांसाठी सामंजस्य करार करण्यात आले असून याद्वारे ७८ हजार २१५ मेगावॅट वीजनिर्मिती अपेक्षित आहे. या प्रकल्पामधून ४ लाख १६ हजार कोटींची गुंतवणूक व १ लाख २८ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. सद्य:स्थितीत सहा प्रकल्पांचे काम सुरु झाले असून त्यातून १० हजार ३०० मेगावॅट क्षमता निर्माण होणार आहे.

**हरित महाराष्ट्र**

७५. राष्ट्रीय वन धोरण, १९८८ नुसार राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी किमान ३३ टक्के क्षेत्र वन व वृक्षाच्छादित असणे अपेक्षित आहे. पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाशी लढा आणि ग्रामीण रोजगार निर्मिती या त्रिसूत्रीवर महाराष्ट्रातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी ३०० कोटी वृक्ष लागवडीची मोहीम हाती घेण्यात येईल.

**उपक्षेत्र चौथे - पाणी व्यवस्थापन**

सन २०४७ पर्यंत पाण्याची लागणारी गरज विचारात घेऊन ग्रामीण व शहरी भागात विहित मानकानुसार पाणी उपलब्धतेची सुनिश्चिती केली जाईल. प्रत्येक नागरी आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे जल लेखा परीक्षण करुन शाश्वत पाणी वापर संस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.

**राज्य जल माहिती केंद्र**

७६. डिजिटल, प्रमाणित आणि ऑनलाईन, जल संपत्तीची माहिती प्राप्त होण्याकरीता राज्य जल माहिती केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. या केंद्राची इमारत नाशिक येथे प्रस्तावित असून, या केंद्रासाठी एकूण ७१ कोटी २० लक्ष रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

**नदीजोड प्रकल्प**

७७. वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजनेच्या ९४ हजार ९६८ कोटी रुपये किंमतीच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

७८. वैतरणा व उल्हास खोऱ्यातील ५४ टीएमसी अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे प्रस्तावित असून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

७९. दमणगंगा- वैतरणा- गोदावरी नदीजोड प्रकल्पाच्या १३ हजार ४९७ कोटी रुपये किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

८०. नार-पार गिरणा नदीजोड प्रकल्पाच्या ७ हजार ४६५ कोटी रुपये किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

८१. दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदी जोड प्रकल्पाच्या एकूण २ हजार २१३ कोटी रुपयांच्या कामास मान्यता देण्यात आली आहे.

८२. बारामती व पुरंदर तालुक्यातील अवर्षण प्रवण भागातील क्षेत्रास पिण्यासाठी व सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याकरिता निरा-कऱ्हा नदीजोड प्रकल्प राबविण्यात येईल.

**महाराष्ट्र राज्य प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम**

८३. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पूर व अन्य धोके निवारणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने २ हजार २४० कोटी रुपये किंमतीचा ‘महाराष्ट्र राज्य प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम’ राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

याअंतर्गत कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी भिमा खोऱ्यातील पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागासाठी वळविण्याच्या कामांचा समावेश आहे.

**संभाव्य एल निनो**

८४. हवामानाचा अंदाज व्यक्त करणाऱ्या अनेक संस्थांनी सन २०२६ मध्ये एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे मान्सूनच्या पावसावर परिणाम होऊन दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

त्या दृष्टीने पिण्याचे पाणी राखून ठेवणे तसेच जलयुक्त शिवार अभियान आणि जलसंधारण योजनांच्या माध्यमातून पाण्याचे संवर्धन व वैरण विकास करीता प्राधान्याने उपाययोजना करण्यात येतील.

**नागरी जलपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर प्रकल्प**

८५. जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यातील शहरामध्ये सुमारे ५ हजार ८६० कोटी रुपये किंमतीचा ‘महाराष्ट्र नागरी जलपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर प्रकल्प’ राबविण्याचे नियोजन आहे. या कार्यक्रमाअंतर्गत नागरी सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया करून प्रभावी पुनर्वापर करण्यात येणार आहे.

## स्तंभ तिसरा - सर्वसमावेशक

## उपक्षेत्र पहिले - सामाजिक न्याय व कल्याण

व्हिजन डॉक्युमेंट - २०४७ द्वारे सर्वसमावेशक विकास साधताना समाजाच्या प्रत्येक घटकाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. सर्व बालकांसाठी सुरक्षित आणि पोषणक्षम वातावरणाची हमी, महिला नेतृत्वाखालील उद्योजकता वाढविणे, ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यदायी, सुरक्षित आणि सन्मानजनक जीवनाची खात्री तसेच शाश्वत आणि वैविध्यपूर्ण उपजीविका निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना**

८६. आम्ही राज्यातील शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना राबविण्याचे आश्वासन दिले होते. त्याकरिता समिती गठीत केलेली आहे. राज्यातील ३० सप्टेंबर, २०२५ रोजी पीक कर्ज थकीत असणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना मी आज जाहीर करीत आहे.

जे शेतकरी कर्ज घेऊन नियमित परतफेड करतात अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने नियमित कर्ज परतफेड केलेली असल्यास, अशा पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येईल.

कर्जमाफी तसेच प्रोत्साहनपर लाभ देण्याबरोबरच राज्यातील बँकिंग यंत्रणा सक्षम असावी यासाठी समितीच्या शिफारशीतील निकषांनुसार निर्णय घेण्यात येईल.

शेतकरी वारंवार कर्जबाजारी न होता त्याला कायमस्वरुपी कर्जमुक्त करण्याचा शासनाचा संकल्प असून याबाबत समितीच्या शिफारशीनुसार दीर्घकालीन उपाययोजना करण्यात येतील.

**अनुसूचित जाती कल्याण**

८७. अनुसूचित जाती घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी राजर्षि शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना, विद्यार्थी वसतिगृहे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना, इत्यादी योजना राबविण्यात येत आहेत. महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ,

संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळाद्वारेही अनेक योजना राबविण्यात येत आहेत. सन २०२६-२७ मध्ये अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाकरिता २३ हजार १५० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याकरिता प्रारुप आराखडा करण्याच्या दृष्टीने समिती गठित करण्यात आली आहे. समितीचा अहवाल लवकरच अपेक्षित असून शिफारशीनुसार समुचित लाभ देण्याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

**आदिवासी कल्याण**

८८. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजना, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना, नमो आदिवासी स्मार्ट शाळा अभियान, आदर्श आश्रमशाळा, भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना, ठक्करबाप्पा आदिवासी विकास योजना तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजना आदि कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेत विंधन विहीरी व सौरपंप हा घटक वनक्षेत्रालगतच्या गावातील आदिवासी शेतकऱ्यांना अनज्ञेय करण्यात आला आहे.

कातकरी, कोलाम, माडीया या आदिम जमाती तसेच पारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पॅकेजद्वारे निधी राखीव ठेवण्यात येणार आहे. सन २०२६-२७ मध्ये आदिवासी घटक कार्यक्रमाकरिता २१ हजार ७२३ कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**इतर मागास व बहुजन कल्याण**

८९. इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळांतर्गत विविध योजना राबविण्यात येत आहेत. ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना, आश्रमशाळा, विद्यानिकेतन, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह योजना, वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना आदि कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

धनगर व गोवारी समाजातील लाभार्थ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांकरिता पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**प्रशिक्षण व संशोधन संस्था**

९०. विविध समाज घटकांसाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम, विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती तसेच संशोधनाचे काम करण्यासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था - सारथी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था-बार्टी, अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था - आर्टी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था - टीआरटीआय, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था - महाज्योती, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था - वनार्टी, महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी - अमृत आणि अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था - मार्टी या संस्था कार्यरत आहेत. या सर्व संस्थांसाठी पुरेशी तरतूद करण्यात आली आहे.

**तृतीयपंथीयांचे कल्याण**

९१. तृतीय पंथीयांच्या सर्वांगीण विकासाकरिता धोरण जाहीर करण्यात आले असून त्यांच्या स्वयंरोजगार व व्यवसायासाठी बीज भांडवल उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**दिव्यांगांसाठी कौशल्य विकास केंद्र व अर्थसहाय्य**

९२. दिव्यांग व्यक्तींना गुणवत्तापूर्ण व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण देवून रोजगारक्षम करण्यासाठी व स्वावलंबन वाढविण्यासाठी राज्यात ३६ ‘कौशल्य विकास व उद्योजकता विकास केंद्रे’ स्थापन करण्यात येणार आहेत. तसेच दिव्यांग लाभार्थ्यांना देण्यात येणारे अर्थसहाय्य यापूर्वीच दरमहा १ हजार ५०० वरुन २ हजार ५०० रुपये करण्यात आले आहे.

दिव्यांगांना शासकीय लाभाच्या सर्व सेवासुविधा एकाच प्लॅटफॉर्मवर देण्यासाठी दिव्यांग सहाय्यक संकेतस्थळ कार्यान्वित करण्यात आले आहे.

दिव्यांगाकरिता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत १ टक्का निधी राखून ठेवण्याकरिता निकष निश्चित करण्यात येत आहेत.

**कामगार कायदे**

९३. केंद्र शासनाने जुने सर्व कामगार कायदे पुनर्रचित करुन चार नवीन कामगार संहिता अंमलात आणल्या आहेत. राज्यातील कामगारांचे हित जोपासण्याकरिता या कामगार संहितांची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

**आकांक्षित जिल्हे व तालुके**

९४. राज्याच्या संतुलित, सर्वांगीण व गतिमान विकासासाठी आकांक्षित जिल्हा व आकांक्षित तालुका कार्यक्रमाचा राज्य योजनेअंतर्गत विस्तार करण्यात येईल.

सध्याच्या गडचिरोली, नंदुरबार, धाराशिव व वाशिम या आकांक्षित जिल्ह्यांसोबतच हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या ६ नवीन आकांक्षित जिल्ह्यांचा समावेश करण्यात येईल. या १० जिल्ह्यातील ७७ तालुके आणि उर्वरित जिल्ह्यांतील १०० आकांक्षित तालुक्यांचा गतिमान विकास करण्यात येणार आहे.

**सिंधुरत्न समृद्ध योजना २.०**

९५. सिंधुदूर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांच्या सर्वंकष विकासासाठी 'सिंधुरत्न समृद्ध योजना' सन २०२४-२५ पर्यंत तीन वर्षांसाठी राबविण्यात आली होती. पुढील तीन वर्षांकरिता 'सिंधुरत्न समृद्ध योजना २.०' प्रस्तावित करण्यात येत आहे. कोकण विभागातील साकव बांधणी व दुरुस्तीसाठी विशेष कार्यक्रम हाती घेण्यात येईल.

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना**

९६. येणाऱ्या ८ मार्च रोजीच्या जागतिक महिला दिनानिमित्त राज्यातील सर्व लाडक्या बहिणींना मी शुभेच्छा देतो. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेसाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.

**एकल महिला धोरण**

९७. सध्या राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकल महिलांचे सर्वेक्षण चालू असून ते पूर्ण झाल्यानंतर त्याचे उचित विश्लेषण करून एकल महिलांच्या कल्याणासाठी सुयोग्य धोरण आणले जाईल.

**लखपती दीदी**

९८. महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत आत्तापर्यंत सुमारे ३७ लाख लखपती दीदी झाल्या आहेत. सन २०२६-२७ मध्ये आणखी २५ लाख लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट आहे.

**उमेद**

९९. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महिला स्वयंसहाय्यता समूहांच्या वस्तू व उत्पादन विक्रीसाठी हक्काची बाजारपेठ मिळवून देण्याकरिता पहिल्या टप्प्यात १३ जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल - जिल्हा विक्री केंद्र' उभारणीस मान्यता देण्यात आलेली आहे.

## उपक्षेत्र दुसरे - शिक्षण आणि कौशल्य विकास

राज्यात १०० टक्के मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान व ८० टक्केहून अधिक पदवीधरांसाठी रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी ८ ते १० शैक्षणिक शहरांची उभारणी करणे, युवकांना उद्योगकेंद्री आणि कौशल्य विकास शिक्षणाद्वारे सुसज्ज करणे, नवोन्मेष आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणारे प्रतिभा केंद्र निर्माण करण्याचे नियोजित आहे.

**एज्युसिटी**

१००. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरात भारतातील पहिली आंतरराष्ट्रीय दर्जाची एज्युसिटी विकसित करण्यात येत आहे. यामध्ये युएसए, युके, ऑस्ट्रेलिया व इटली या देशातील सहा आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या सर्व विद्यापीठांचे अभ्यासक्रम यावर्षी सुरु होणार असून या उपक्रमामुळे राज्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी येतील.

**डॉ. पंजाबराव देशमुख शैक्षणिक संकुल**

१०१. अमरावती शहरातील शिक्षण विभागाची सर्व कार्यालये एकत्रित आणण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख शैक्षणिक संकुलाची उभारणी करण्यात येईल.

**मुख्यमंत्री विज्ञान वारी**

१०२. राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी आपण बक्षीस रकमेत मोठी वाढ केली आहे.

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री विज्ञान वारी उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांना ‘इस्रो’ (ISRO) आणि अमेरिकेतील ‘नासा’ या जगप्रसिद्ध संस्थांना भेट देण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

**मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास- दक्ष**

१०३. जागतिक बँकेच्या सहकार्याने आपण ‘दक्ष’ हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत आहोत. याअंतर्गत महिमा (महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी अँड अँडव्हान्समेन्ट) या संस्थेची स्थापना केली जाईल. या माध्यमातून आपल्या तरुणांना परदेशातील नोकऱ्यांसाठी आवश्यक भाषा, कौशल्य प्रशिक्षण आणि आर्थिक मार्गदर्शन दिले जाईल.

राज्यातील समुपदेशन सेवांचा विस्तार व अधिक संघटित व्यवस्था निर्माण करण्यासाठी ३६ नवदिशा केंद्रे स्थापन करण्यात येतील.

महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नावीन्यता धोरण - २०२५

१०४. मला सांगताना अभिमान वाटतो की, केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र आज देशाचे स्टार्टअप कॅपिटल ठरले आहे. 'युनिकॉर्नच्या' संख्येतही आपले राज्य देशात प्रथम क्रमांकावर आहे.

राज्याला जागतिक केंद्र बनवण्यासाठी आम्ही नवीन स्टार्टअप व नावीन्यता धोरण-२०२५ जाहीर केले आहे. पुढील ५ वर्षांत १ लाख २५ हजार उद्योजक घडवणे आणि ५० हजार स्टार्टअप्सना बळ देणे, हे आमचे उद्दिष्ट आहे.

तळागाळातील नवउद्योजकांना आर्थिक बळ देण्यासाठी आपण मुख्यमंत्री उद्योजकता महाफंड स्थापन करत आहोत. यातून निवडक स्टार्टअप्सना थेट आर्थिक मदत दिली जाईल.

या उपक्रमांतर्गत ५० सर्वोत्तम स्टार्टअप्सची निवड केली जाईल. त्यांना त्यांचे नाविन्यपूर्ण प्रकल्प शासकीय विभागांमध्ये राबवण्यासाठी २५ लाख रुपयांपर्यंतची कामे निविदेशिवाय थेट दिले जातील.

चर्मकला केंद्र बांद्रा, मुंबई

१०५. चर्मकला डिझाईन व उत्पादन अद्ययावत केंद्र बांद्रा, मुंबई येथे स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये नावीन्यता आणि उद्योजकता केंद्रासह सर्व सुविधा असलेली बहुमजली इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे.

बिरसा योजना

१०६. आदिवासी जमातीतील युवांना नाविन्यतेवर आधारित उद्योजक आणि उद्योग निर्माते बनविण्यासाठी राज्यात 'भारत इनोव्हेशन, रिसर्च, स्टार्टअप्स फॉर आत्मनिर्भरता-बिरसा' ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## उपक्षेत्र तिसरे - आरोग्य

सर्व स्तरावरील नागरिकांसाठी सुलभ किफायतशीर व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवेची सुनिश्चिती करणे व त्याद्वारे राज्यातील नागरिकांचे सरासरी आयुर्मान वाढविणे यासाठी आरोग्य सेवांचा विस्तार करुन ती शेवटच्या टप्प्यापर्यंत सर्व नागरिकांना पोहचविण्याचे उद्दिष्ट आहे. विशेषज्ञ आरोग्य सेवा आणि संशोधनासाठी परिसंस्था म्हणून मेडिसिटीज स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे. प्राथमिक, द्वितीयक आणि तृतीयक आरोग्य सेवांचा विस्तार करण्याचे नियोजन आहे.

निसर्गोपचार केंद्र

१०७. ताणतणाव, जीवनशैलीजन्य आजार, मानसिक आरोग्य तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यसेवांसाठी सातारा जिल्ह्यात दरे परिसरात निसर्गोपचार केंद्र उभारण्यात येईल. तसेच मुंबई महानगर परिसरात वैदिक ज्ञान व संगीत परंपरेवर आधारीत वेलनेसचे उत्कृष्टता केंद्र विकसित करण्यात येईल.

**प्रगती योजना** १०८. कर्करोग, मधुमेह व हृदयविकार यासारख्या आजारांचे लवकर निदान करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या सहाय्यातून ग्रामीण भागात दरवर्षी तपासणी मोहिम राबविण्याकरिता ४ हजार ५०० कोटी रुपये किंमतीची 'प्रगती योजना' प्रस्तावित आहे.

**शहरी आरोग्य आयुक्तालय** १०९. राज्यातील २९ महानगरपालिका, २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगरपंचायतीमध्ये राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम व आरोग्य विभागाच्या सर्व गुणवत्तापूर्ण सुविधा देण्याकरिता समन्वय साधणे व कामकाजाचे सनियत्रंण करण्यासाठी शहरी आरोग्य आयुक्तालयाची स्थापना करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**महाराष्ट्र डिजिटल आरोग्य तंत्रज्ञान अभियान** ११०. राज्यात डिजिटल सार्वजनिक आरोग्य परिसंस्था निर्माण करण्यासाठी 'महाराष्ट्र डिजिटल आरोग्य तंत्रज्ञान अभियान' राबविण्यात येईल. यामुळे रिअल-टाइम डॅशबोर्डच्या आधारे प्रभावी निर्णयप्रक्रिया आणि सनियंत्रण करणे शक्य होईल.

**जन आरोग्य योजना** १११. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचारांच्या संख्येत १ हजार ३५६ वरुन २ हजार ३९९ इतकी वाढ करण्यात आली असून अंगीकृत रुग्णालयांची संख्या १ हजार ७९२ वरुन ४ हजार ५३७ पर्यंत वाढविली आहे.

या योजनेंतर्गत जास्त खर्च होणाऱ्या नऊ प्रकारच्या अवयव प्रत्यारोपणाच्या उपचारांसाठी २२ लक्ष रुपये रकमेपर्यंतचा खर्च राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या राखीव निधीतून करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था** ११२. सार्वजनिक आरोग्याच्या सर्वंकष उन्नतीसाठी एम्स व आयआयएम च्या धर्तीवर उच्च गुणवत्तेच्या प्रशिक्षण व संशोधनासाठी नागपूर येथे भारतीय सार्वजनिक आरोग्य संस्थेच्या सहकार्याने 'महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था' स्थापन करण्यात येईल.

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय** ११३. राज्यात ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये कार्यान्वित आहेत. त्यापैकी नव्याने मान्यता दिलेल्या ११ महाविद्यालयांची बांधकामे विविध टप्प्यावर आहेत.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई या संस्थेच्या इमारतीच्या एकत्रिकरणाकरिता बृहद् आराखडा तयार करण्यात येईल.

आरोग्य संस्थांचे बळकटीकरण

११४. राज्यात विविध जिल्हा आरोग्य संस्थांची बळकटीकरणाची कामे सुरु असून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

बीड येथील जिल्हा रुग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी ३६० खाटांचे रुग्णालय बांधकाम, नर्सिंग कॉलेज व वसतीगृहाचे काम प्रस्तावित आहे.

**उपक्षेत्र चौथे - सॉफ्ट पॉवर**

राज्यास भाषा, कला, क्रीडा व संस्कृतीचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. या बाबींचे जतन, संवर्धन व त्याचा प्रसार करणे, सांस्कृतिक वारशाचे महत्त्व विशद करणे, अधिकाधिक प्रसिद्धी देवून त्यांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करण्याकरिता राज्यातील क्रीडा पायाभूत सुविधा व प्रशिक्षणावर विशेष भर देण्यात येणार आहे.

सिंहस्थ कुंभमेळा

११५. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे सन २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा संपन्न होणार आहे. कुंभमेळ्याच्या आयोजनासाठी प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळ्यानिमित्त देशभरातून आणि परदेशातून मोठ्या प्रमाणावर भाविक येतील. या कुंभमेळ्याचे सुयोग्य आयोजनासाठी एकात्मिक विकास आराखडा तयार करण्यात आला असून त्याकरिता आवश्यक निधी उपलब्ध करण्यात येत आहे.

याअंतर्गत गोदावरी नदी स्वच्छता, त्र्यंबकेश्वर येथे उपसा योजनेद्वारे अमृतस्नान व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मलनि:स्सारण प्रकल्प, घाट सुधारणा व सुशोभिकरण इत्यादी कामे प्रगतीपथावर आहेत.

तसेच नाशिक विमानतळ, रिंग रोड, रेल्वे स्टेशन व बस स्टेशन इत्यादी पायाभूत सुविधांच्या श्रेणीवर्धनाची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

जागतिक वारसा नामांकन

११६. युनेस्कोच्या जागतिक वारसा नामांकन प्राप्त झालेल्या १२ किल्ल्यांमध्ये राज्यातील राजगड, रायगड, प्रतापगड, साल्हेर, लोहगड, शिवनेरी, पन्हाळा, खांदेरी, सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग आणि तामिळनाडूतील जिंजी या किल्ल्यांचा समावेश आहे.

या ऐतिहासिक किल्ल्यांचे जतन करण्याकरिता आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

**शिवसृष्टी** ११७. आंबेगाव-बुद्रुक, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील शिवसृष्टी प्रकल्पासाठी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ला परिसर विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्यात येईल.

**आग्रा शिवस्मारक, मराठा शौर्य स्मारक** ११८. आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक व पानिपत, हरियाणा ‘काला अंब’ येथे मराठा शौर्य स्मारक उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. या स्मारकांच्या जागा निश्चितीसाठी संबंधित राज्य सरकारांशी समन्वय साधण्यात येत आहे.

**छत्रपती संभाजी महाराज स्मारक** ११९. स्वराज्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांच्या मौजे तुळापूर येथील भव्य स्मारकाचे काम जून, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. मौजे वढु बुद्रुक येथील समाधीस्थळाचे काम जून, २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी येथील स्मारकाच्या कामाचा नियोजन आराखडा अंतिम टप्प्यात असून काम लवकरच हाती घेण्यात येईल.

**अजिंक्यतारा व संगम माहुली** १२०. सातारा येथील अजिंक्यतारा किल्ल्याचे तसेच संगम माहुली, सातारा येथील महाराणी ताराबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधीस्थळांचे जतन, संवर्धन व जीर्णोद्धार करण्यात येईल.

**महात्मा ज्योतिराव फुले यांचे स्मारक** १२१. थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जन्मगावी मौजे कटगुण, तालुका खटाव, जिल्हा सातारा येथे भव्य स्मारक उभारण्याचे प्रस्तावित आहे.

**ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक** १२२. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा येथे स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद अकादमीची स्थापना** १२३. मराठी भाषेतील साहित्य व ग्रंथ अन्य भाषांमध्ये तसेच अन्य भाषांमधील दर्जेदार साहित्य मराठी भाषेमध्ये अनुवादित करण्यासाठी ‘यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद अकादमी’ स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

टिंबर म्युझियम व झायलॅरियम १२४. वन संपदेने समृद्ध चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर येथील सागवान वारशाचे जतन, संशोधन व जनजागृतीसाठी ‘ टिंबर म्युझियम व झायलॅरियम ’ उभारण्याचे प्रस्तावित आहे.

मिशन लक्ष्यवेध १२५. सन २०३६ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी भारत प्रयत्नशील आहे. राज्यातून जास्तीत-जास्त खेळाडूंनी ऑलिम्पिकमध्ये सहभाग नोंदवावा याकरिता ‘ मिशन लक्ष्यवेध ’ योजनेअंतर्गत ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, हॉकी, कुस्ती, आर्चरी, शूटींग, रोईंग, सेलिंग, लॉन टेनिस व टेबल टेनिस या १२ खेळांचे राज्य स्तरावर ८ हाय परफॉर्मन्स सेन्टर्स सुरु करण्यात आले आहेत. आणखी ४ केंद्रे सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

विभागीय स्तरावर २५ क्रीडा उत्कृष्टता केंद्रे व जिल्हा स्तरावर ९६ क्रीडा गुणवत्ता विकास केंद्रे सुरु करण्यात येतील.

राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरीय क्रीडासंकुलांच्या विकासासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे.

## स्तंभ चौथा - सुशासन व गतिमानता

### उपक्षेत्र पहिले - प्रशासन

आर्थिक व सामाजिक गरजानुसार प्रशासकीय व्यवस्थेची पुनर्रचना करणे, अधिकारी-कर्मचारी यांचे सेवाप्रवेश ते निवृत्तीपर्यंतच्या सेवाप्रक्रिया स्वयंचलित पद्धतीने करणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या व खाजगी क्षेत्राच्या सहाय्याने नागरी सेवा पुरविण्यात अव्वल राज्याचा दर्जा प्राप्त करण्याचे ध्येय आहे.

सेवाकर्मी १२६. विकसित महाराष्ट्र - २०४७ कडे वाटचाल करीत असताना पारदर्शक, गतिमान आणि उत्तरदायी सुशासनाचे उद्दिष्ट साध्य करणे आवश्यक ठरते. त्याकरिता सर्व प्रशासकीय विभागांचे सेवाप्रवेश नियमांचे एकत्रीकरण, प्रमाणीकरण व सुलभीकरण करण्यात आले आहे.

महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर आत्तापर्यंत १ लाख २० हजार पदभरती करण्यात आली असून पुढील कालावधीत टप्प्याटप्प्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोग व इतर यंत्रणांमार्फत ७५ हजार पदांची पदभरती करण्यात येणार आहे.

**शासकीय प्रक्रिया पुनर्रचना** १२७. राज्यातील नागरिकांना शासकीय योजना आणि सेवा सहज, सुलभ आणि उत्तरदायी पद्धतीने देण्याकरिता शासकीय प्रक्रिया पुनर्रचना उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या अंतर्गत, अर्ज प्रकियेमधील अनावश्यक माहिती, कागदपत्रे, तसेच छाननी प्रकियेचे टप्पे व लागणारा कालावधी लक्षणीयरित्या कमी करण्यात येत आहे. यासाठी आपले सरकार पोर्टल २.०, मैत्री पोर्टल २.०, महा-डिबीटी २.० नव्याने विकसित करण्यात येत आहेत.

**महाराष्ट्र भूमि मालकी हक्कधारी अधिनियम** १२८. नागरिकांच्या मालमत्तांमधील वाद कमी करणे, मालमत्ता हस्तांतरणामधील गैरव्यवहारांना प्रतिबंध करणे आणि मालमत्तांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र भूमि मालकी हक्कधारी अधिनियम आणण्यात येईल.

## उपक्षेत्र दुसरे - तंत्रज्ञान

प्रभावी शासनासाठी सर्व नागरिक आणि व्यवसाय सेवा डिजिटलायझेशन, राज्यात प्रगत तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे. जमिनीचे १०० टक्के व्यवहार संगणकीकृत करणे, १०० टक्के ई-ऑफिस स्विकार आणि कागदविरहित शासकीय कामकाज सुरु करण्याचे नियोजित आहे.

**माहिती तंत्रज्ञान विभागाचे सक्षमीकरण** १२९. प्रभावी धोरणनिर्मिती, जलद निर्णयप्रक्रिया तसेच उत्तरदायित्व सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने पुरेशा मनुष्यबळासह इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग स्वतंत्रपणे स्थापन करण्यात येणार असून, त्यास सहाय्यक म्हणून आयुक्तालय तसेच स्वतंत्र माहिती तंत्रज्ञान संवर्ग कार्यान्वित करण्यात येईल.

**कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रात नामवंत संस्थांसोबत भागीदारी** १३०. राज्यातील माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्र गतिमान करण्याचे उद्देशाने ओपन एआय व सर्वम एआय या जागतिक व राष्ट्रीय स्तरावरील नामवंत संस्थांसोबत हेतूपत्र करण्यात आलेले आहे. तसेच आयआयटी, मुंबई आणि भारतजेन यांच्या समवेत शासनाने सामंजस्य करार केलेला आहे.

**उदयोन्मुख व अग्रगण्य तंत्रक्षेत्र धोरण** १३१. कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम संगणन, ड्रोन, स्वयंचलित वाहन व डीपटेक यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात राज्याला जागतिक दर्जाचे केंद्र म्हणून विकसित करणे तसेच संशोधन नवोन्मेष व उच्च मूल्य उत्पादनांची परिसंस्था निर्माण करणे, या हेतूने राज्यात विशेष धोरण अंमलात आणण्यात येणार आहे.

**सायबर सुरक्षा धोरण** १३२. विकसित महाराष्ट्र-२०४७ या दृष्टीकोनाशी सुसंगत सायबर सुरक्षा धोरण राबविण्याचे प्रस्तावित आहे. राज्याला सुरक्षित, विश्वासार्ह आणि भविष्यासाठी सज्ज असे डिजिटल राज्य बनविणे, हे या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**नागपूर स्टेट डेटा सेंटर** १३३. राज्याच्या सार्वभौम डेटाची व अनुप्रयोगांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी नागपूर येथे अत्याधुनिक स्टेट डेटा सेंटर स्थापन करण्यात येईल.

**महाराष्ट्र जिओटेक्नोलॉजी ॲप्लिकेशन सेंटर** १३४. राज्यात महाराष्ट्र जिओटेक्नोलॉजी ॲप्लिकेशन सेंटरची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्याच्या आर्थिक विकासासाठी राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांचे कार्यक्षम व प्रभावी पद्धतीने नियोजन करुन त्याच्या अंमलबजावणीचे कार्य हे केंद्र करेल.

## उपक्षेत्र तिसरे - सुरक्षा

गुन्हे तपासणी तसेच आपत्ती प्रतिरोधकता व रस्ते सुरक्षा सक्षम करणे हे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता अद्ययावत फौजदारी कायदे संहितेच्या अंमलबजावणीस गती देण्यात येत आहे. तंत्रज्ञानावर आधारित पोलीस व्यवस्था, पोलीस नोंदींचे १०० टक्के डिजिटलायझेशन, सक्षम सीसीटीव्ही यंत्रणा, सर्व जिल्ह्यात प्रगत न्यायवैद्यक सायबर केंद्र कार्यान्वित करणे आणि आयटीएमएस सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करुन नागरिकांना सुरक्षा प्रदान करण्याचे नियोजन आहे.

**मानव-वन्यजीव संघर्ष निवारण** १३५. मानव-वन्यजीव संघर्ष निवारणाकडे राज्यशासनाने गांभीर्याने लक्ष दिले असून या समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

वन्यजीवांच्या हालचालीची पूर्वसूचना देण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्ता प्रणालीचा वापर, रात्रीच्या गस्तीसाठी विशेष थर्मल ड्रोन व कमांड ॲन्ड कंट्रोल सेंटर आणि सौर कुंपण योजना यासाठी निधी उपलब्ध केला जाईल.

**बॉडी वोर्न कॅमेरा** १३६. विकसित महाराष्ट्र - २०४७ उपक्रमांतर्गत स्मार्ट पोलिसिंग आणि न्यायदानासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी महाराष्ट्र पोलीस दलाकरिता बॉडी वोर्न कॅमेरा उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही तीन वर्षात टप्याटप्याने करण्यात येणार आहे.

गुन्हे तपासात आधुनिक तंत्रज्ञान

१३७. राज्यात २१ पथदर्शी फिरती न्यायवैद्यक वाहने लोकार्पित करण्यात आली असून सायबर सुरक्षा स्थिती आणि नागरिकांची सुरक्षा सुधारण्याकरिता महाराष्ट्र सायबर गुन्हे सुरक्षा महामंडळ कार्यान्वित करण्यात आले आहे.

राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था

१३८. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीचे सौम्यीकरणासाठी संशोधनात्मक अभ्यासपूर्ण व्यवस्थापनाकरिता राज्यात ‘राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था’ मिहान, नागपूर येथे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

राज्य आपत्ती निवारण दल

१३९. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या धर्तीवर राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची स्थापना करुन त्यांच्या चार तुकड्या स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**उपक्षेत्र चौथे - वित्त**

खर्चाचे सुसूत्रीकरण, महसूल प्रणालीचे आधुनिकीकरण, कामगिरीवर आधारित अंदाजपत्रकाची सुनिश्चती आणि पर्यायी वित्तपुरवठ्यांच्या स्त्रोतांचा वापर या उपक्रमांद्वारे दूरदर्शी आर्थिक व्यवस्थापन आणि पर्यायी शाश्वत राजकोषीय मार्ग सुनिश्चित करणे हे राज्याचे उद्दिष्ट आहे.

सार्वजनिक खाजगी धोरण

१४०. विकसित महाराष्ट्र - २०४७ चे स्वप्न साकार करण्यासाठी सार्वजनिक गुंतवणूकीबरोबरच खाजगी गुंतवणूकीची आवश्यकता आहे. त्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक-खाजगी भागीदारी धोरणास मान्यता देण्यात आली आहे. या धोरणामुळे राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल उपलब्ध होऊन अर्थव्यवस्थेला गती मिळेल.

वस्तू व सेवा कर संकलन

१४१. देशाच्या एकूण वस्तू व सेवा कर संकलनात राज्य देशात प्रथम क्रमांकावर असून महसूल वाढीचा दर देशाच्या सरासरीपेक्षा जास्त आहे.

वस्तू व सेवा कर दरांच्या पुनर्रचनेमुळे उत्पादन व उपभोग यामध्ये सकारात्मक वाढीचा कल दिसून आला आहे.

सुधारित अंदाज सन २०२५-२६

१४२. सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात ५ लाख ६० हजार ९६४ कोटी रुपये महसूली जमा अपेक्षित होती. महसूली जमेचे सुधारित अंदाज ६ लाख १ हजार ४८९ कोटी रुपये निश्चित करण्यात आले आहेत. सन २०२५-२६ च्या

एकूण खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज ७ लाख २० कोटी रुपये व सुधारित अंदाज ७ लाख ५५ हजार ९२० कोटी रुपये असून, भांडवली व कल्याणकारी योजनांवरील खर्चात झालेल्या वाढीमुळे सन २०२५-२६ या वर्षाच्या एकूण खर्चाच्या सुधारित अंदाजात वाढ झाली आहे.

**जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७**

१४३. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत २१ हजार ८६७ कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही तरतूद १ हजार ७०२ कोटी रुपयांनी अधिक आहे.

**वार्षिक योजना सन २०२६-२७**

१४४. सन २०२६-२७ मध्ये कार्यक्रम खर्चाची रक्कम २ लाख ७५ हजार ६२६ कोटी रुपये निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती घटक कार्यक्रमासाठी २३ हजार १५० कोटी रुपये, तर आदिवासी घटक कार्यक्रमासाठी २१ हजार ७२३ कोटी रुपये नियतव्ययाचा समावेश आहे.

**अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२७**

१४५. सन २०२६-२७ च्या अर्थसकंल्पामध्ये एकूण खर्चासाठी ७ लाख ६९ हजार ४६७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पामध्ये महसुली जमा ६ लाख १६ हजार ९९ कोटी रुपये व महसुली खर्च ६ लाख ५६ हजार ६५१ कोटी रुपये अंदाजित केला आहे. परिणामी ४० हजार ५५२ कोटी रुपये अंदाजित तूट येत आहे.

**राजकोषीय तूट**

१४६. राजकोषीय सुधारणांमध्ये राज्य नेहमीच अग्रेसर राहिले आहे. राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात यंदाही शासन यशस्वी ठरले आहे. तसेच राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे. सन २०२६-२७ ची राजकोषीय तूट १ लाख ५० हजार ४९१ कोटी रुपये आहे.

यानंतर मी अर्थसंकल्पाच्या भाग दोन कडे वळतो.